दुग्धशास्त्र

# दुधाच्या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी हे लक्षात ठेवा...

**प्रा. अनंत सरनाईक**
स्कूल ऑफ अ‍ॅग्रीकल्चरल सायन्सेस,
जी.एच. राईसोनी विश्वविद्यालय,
साईखेडा,
जि. छिंदवाडा (मध्य प्रदेश)







आजच्या काळामध्ये बरेच बेरोजगार युवक दुग्ध व्यवसायाकडे वळत आहेत. काहींचा दुग्ध व्यवसाय हा यशस्वी होतो तर काही युवकांना या व्यवसायामध्ये तोटाही सहन करावा लागतो. याला अनेक कारणे आहेत- जसे की गुरांच्या बाजारामध्ये पशु खरेदी करताना होणारी फसवणूक, मजुरांकडून होणारी फसवणूक किंवा चारा खरेदी करताना झालेली फसवणूक. यामध्ये अनुभवानुसार आपण सुधारणा करु शकतो. परंतु काही शास्त्रीय कारणे सुद्धा आहेत. त्यांची मांडणी करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

दुग्ध व्यवसाय यशस्वी करण्यासाठी हा व्यवसाय करणाऱ्यांनी योग्य ती काळजी घेतल्यास फायदा होतो, त्याकरिता खालील मुद्दे महत्त्वाचे आहेत.

१. दुग्ध व्यवसाय सुरु करण्याआधी उपलब्ध बाजारपेठ व मागणीवर आधारित दुग्धोत्पादनाचा विचार करावा.

२. संतुलित/ पोषक आहारात एकदल व व्दिदल पिकांचा योग्य प्रमाणात समावेश करावा.

३. खुराक घरचेघरी तयार करुन खुराकावर होणारा खर्च कमी करावा.

घरी तयार करावयाचा खुराक - गहू/ बाजरी/ मका/ ज्वारी - ४० किलो यापैकी कुठलेही एकदल, सोयाबीन/ उडीद/ मूग/ तूर २० किलो यापैकी कोणतेही व्दिदल + जवस/ भुईमूग २० किलो + सरकी २० किलो एकत्र करुन १ लिटर दूध उत्पादनासाठी ४०० ग्रॅम प्रमाणे द्यावा.



४. रोज सकाळी गोपालकाने आपल्या गोठ्यामध्ये भेट द्यावी व कुठले जनावर माजावर आहे ते तपासावे; म्हणजे जनावराचा माजाचा काळ वाया जाणार नाही. कारण जनावर हे योग्य वेळीच फळवले गेले पाहिजे. तसेच अशा पाहणीमुळे जनावरांना जखमा आहेत का किंवा ते आजारी आहे का तेही कळेल.

५. तेथील स्वच्छता सुद्धा लक्षात येईल. कारण स्वच्छता नसेल तर अनेक परजीवी जसे- गोचिड, गोमाशी, उवा यांचा प्रसार होतो तसेच डास सुद्धा जनावरांना त्रास देतात. त्यामुळे ते योग्य प्रमाणात चारा खाऊ शकत नाहीत व जनावरांना ताण जाणवतो. गोचिड झाल्यास ०.५ टक्के मेलेथिऑन किंवा ब्युटॉक्स औषध वापरावे. गोठ्यात शेण व गोमूत्र साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. हे केल्यास लम्पीसारख्या आजाराला काही प्रमाणात अटकाव होईल.

६. वासराची काळजी घेणे सुद्धा गरजेचे असते. जर ते वासरु दूध पीत असेल तर त्याला योग्य प्रमाणात दूध पाजावे. वासरांना ओळखखुणा बांधाव्यात व त्यांची नोंद करावी. पहिल्या १५ दिवसांत डॉक्टरकडून शिंगकळ्यांचा (शिंगाचे कोंब) नाश करावा.

७. दुधाळ जनावरांना २० ते २५ किलो हिरवा चारा, ५ ते ६ किलो वाळलेला चारा व ४ ते ६ किलो ग्रॅम खुराक द्यावा. तसेच ३० ग्रॅम मिनरल मिक्श्चर ३० ग्रॅम मीठ, व्हिटॅमिन १ ग्रॅम हिटा ब्लड द्यावे.

८. दुधाळ जनावरांना भाकड करणे (आटवणे) गरजेचे असते. जनावर विण्याच्या दोन महिने अगोदर दूध काढणे टप्प्याटप्प्याने बंद करावे.

९. भाकड जनावरांना १ ते २ किलो आलप (खुराक) द्यावा.

१०. गायीचा दूध देण्याचा कालावधी २८० ते ३०० दिवस असावा. भाकड काळ ४५ ते ६० दिवस असावा.

११. गाय व म्हैस व्यायल्यानंतर ६० ते ९० दिवसांत फळवावी. म्हणजे त्यापासून जास्त वेत घेता येतील व आपल्या दुग्ध उत्पादनात खंड पडणार नाही.

१२. दूध स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. दूध काढण्याचे व साठवण्याचे भांडे नेहमी स्वच्छ ठेवावे.

१३. जनावरांचे वेळोवेळी लसीकरण करुन घ्यावे तसेच जंतांचे औषध द्यावे.

१४. जनावर व्यायल्यानंतर घ्यावयाची काळजी : १ किलो बाजरी, ५०० ग्रॅम मेथी, २५० ग्रॅम गूळ, १०० ग्रॅम खोबरे, १०० ग्रॅम गोडेतेल, ५० ग्रॅम मीठ, २० ग्रॅम ओवा, २० ग्रॅम बाळंतशेपा, २० ग्रॅम शेपा यांची खिचडी शिजवावी व २ ते ३ दिवस द्यावी. यामुळे अशक्तपणा जातो व जनावराची झालेली झीज भरुन निघते तसेच येणाऱ्या काळामध्ये जनावरे चांगले दूध देतात.

१५. प्रत्येक जनावराचे वंशावळीचे रजिस्टर ठेवावे, जेणेकरुन जनावराच्या पुढच्या पिढीमध्ये त्याचा फायदा होईल, जातिवंत जनावरे मिळण्यास मदत होईल व दुग्ध उत्पादन वाढ होईल.

१६. पशुपालकांनी आपल्या जनावरांचा विमा काढावा व जनावरे रजिस्टर करावी. तसेच पशुपालकांनी प्रथमोपचार पेटी नेहमी आपल्या गोठ्यामध्ये ठेवावी. त्यामध्ये खालील औषधांचा समावेश असावा.

**पशुपालकांनी प्रथमोपचारासाठी किमान औषधे ठेवावीत**

१. **जंतांसाठी** : फेज बेंडा साल, अल्बेडाझाल, पायझेन, बॅनमिंथ, प्रिप–याझीन, पॅनाक्युअर.



२. **स्वच्छता राखण्यासाठी चुना** : गॅमॅक्झिन.

३. **ड्रेसिंगसाठी** : कापूर, बँडेज, चिकटपट्टी, हायड्रोजन पेरॉक्साईड, डेटॉल, साबण, पोटॅशियम परमँग्नेट, टी. बेन्झिन, टी. आयोडिन, झिंक ऑक्साईड, बोरीक पावडर, ॲन्टिबायोटिक पावडर, लॉरेक्झेन मलम, सल्फा पावडर, निंबोळी, हिमॅक्स टॉपिक्युअर स्प्रे, एरंडी तेल, सडात सोडण्याचे मलम, पेंडीस्ट्रिनट्यूब, स्वेलनिल मलम, आयोडेक्स इत्यादी.

४. **डायरियासाठी** : सल्फा व ॲन्टिबायोटिक गोळ्या, केओलिन+ खडू+ काथ, नेबलॉन.

५. **वार पाडण्यासाठी** : रिप्लान्टा पावडर.

६. **पोटफुगीसाठी** : टर्पेंटाईन + गोडेतेल, रिंपोल पावडर.

७. **वेदनाशामक (पेन किलर)** : एव्हील नोव्हालजिन, व्हेटालजिन

८. **खोकल्यासाठी** : कॅफलॉन पावडर.

९. **किमान उपकरणे** : थर्मामीटर, चिमटा, कैची, धारदार चाकू, औषधे पाजण्यासाठी बाटली, पिल्लांना दूध पाजण्याची बाटली, खूर कापण्याचा चाकू.

१०. **परोपजीवी जंतुनाशके** : ब्युटॅक्स, मॅलॅथऑन, फेनॉल.

**जनावरांच्या आजारांनुसार लसीकरणाचे वेळापत्रक**

| अ. | रोग | गाय | म्हैस/रेडा | बैल | शेळी/मेंढी | वासरे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घटसर्प | मे–जून | मे–जून | मे–जून | मे– | मे–जून |
| २ | फऱ्या | मे–जून | मे–जून | मे–जून | जुलै | मे–जून |
| ३ | बुळकांडी | एप्रिल/सप्टेंबर | एप्रिल/सप्टेंबर | एप्रिल/सप्टेंबर | – | एप्रिल/सप्टेंबर |
| ४ | लाळ खुरकत | एप्रिल/ऑक्टोबर | एप्रिल/ऑक्टोबर | एप्रिल/ऑक्टोबर | ऑक्टोबर | एप्रिल |
| ५ | फाशी | मे | मे | मे | मे | मे |
| ६ | पीपीआर | – | – | – | मे–जून | – |
| ७ | देवी | – | – | – | एप्रिल–डिसेंबर | – |
| ८ | न्युमोनिया | – | – | – | जानेवारी | – |
| ९ | आंत्रविषार | – | – | – | मे–जून | – |
| १० | सीसीपी | – | – | – | जून | – |

अशा प्रकारे आपण अंमलबजावणी केल्यास नक्कीच आपला दुग्धव्यवसाय यशस्वी होण्यास मदत होईल.